# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२३

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### दहिसर (मुंबई) येथील एक्सर गावातील बृहन्मुंबई महापालिकेच्या ताब्यातील भूखंडावरील लोकवस्ती झोपडपट्टी म्हणून घोषित करण्याबाबत

**(१) ६७४४ (१७-०३-२०२१) श्री.विलास पोतनीस : दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४ मधील प्रश्न क्रमांक ३५८३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिसर (मुंबई) येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आर/उत्तर विभागातील एक्सर गावातील न.भू.क्र. ८२८, ८५७ व ८६७ हा भूखंड मंजूर विकास आराखडा, १९९१ नुसार उद्यान, रुग्णालय, प्रसूतिगृह, खेळाचे मैदान, दवाखाना तसेच १८.३० मी. व १३.४० मी. रुंद विकास नियोजन रस्ता इत्यादी सार्वजनिक उद्दिष्टांकरीता आरक्षित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनीचा भूसंपादन प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सुधार समितीच्या दिनांक २९ नोव्हेंबर, २०१९ रोजी पार पाडलेल्या बैठकीत ठराव क्र. ११७ अन्वये मंजूर करण्यात आला असून दिनांक ७ जानेवारी, २०२० रोजी पार पडलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या महासभेत देखील मंजूर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भूखंडावर सद्य:स्थितीत मोठ्या प्रमाणावर नागरिकांची वस्ती वसलेली असल्याने सदरहू भूखंडाचा सार्वजनिक उद्दिष्टांसाठी विकास करताना येथील नागरिकांना विस्थापित न करता त्याच ठिकाणी पुनर्वसन करण्यासाठी उक्त ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प (S.R.A.) राबविण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री, मा.नगरविकास मंत्री, पालकमंत्री, मुंबई उपनगर यांच्यासह आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांजकडे माहे डिसेंबर, २०२० च्या पहिल्या सप्ताहात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने दहिसर (मुंबई) येथील एक्सर गावातील न.भू.क्र. ८२८, ८५७ व ८६७ या बृहन्मुंबई महापालिकेच्या ताब्यातील भूखंडावरील लोकवस्ती झोपडपट्टी म्हणून घोषित करण्याबाबत कोणता धोरणात्मक निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर जमिनीचे भूसंपादन करण्यासाठी सुधार समिती व महानगरपालिका यांची अनुक्रमे दिनांक १७/१०/२०११ व दिनांक २३/१२/२०११ च्या ठरावान्वये मंजुरी प्राप्त झाली होती.

तसेच सुधार समितीच्या दिनांक २९/११/२०१९ व महापालिकेच्या दिनांक ०७/०१/२०२० रोजीच्या ठरावान्वये सदर भूसंपादन प्रस्तावाला मागे घेण्यास / बंध करण्यासाठीचा प्रस्ताव नामंजूर केला.

(३) हे खरे आहे.

(४) सदर भूखंडावर कोणतीही झोपडपट्टी पुनर्वसन योजना मंजूर नसल्याचे अभिप्राय झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडून प्राप्त झाले आहेत.

तथापि, सदर भूखंडाचा विकास झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत न करता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणाप्रमाणे करणे योग्य ठरेल, असे संबंधित लोकप्रतिनिधींना दिनांक २८/०१/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षकांचे वेतन नियमित करण्याबाबत

**(२) १०९०१ (०६-०१-२०२२) :श्री.विल्पव बाजोरिया, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके, श्री.रामदास आंबटकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.प्रसाद लाड** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षकांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला करणेबाबत शासनाने आदेश दिला असून कोविड-१९ च्या पार्श्वभूमीमुळे निधी नसल्याने मागील अनेक दिवसांपासून शिक्षकांचे नियमित वेतन होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या कोविड-१९ ची परिस्थिती सुधारत असून शासनाकडून शिक्षकांच्या वेतनासाठी निधी देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकांचे वेतन नियमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (२७-०६-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) हे खरे आहे. वित्त विभागाकडून उपलब्ध झालेल्या निधीनुसार वेतनासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. याबाबत मा.उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये शिक्षकांचे वेतन दरमहा नियमित होण्यासाठी पाठपुरावा करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. तसेच खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षकांचे मासिक वेतन देयक विहित वेळेत सादर करणे, ही सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ या अधिनियमान्वये अधिसूचित करण्यात आलेली आहे.

---

## राज्य शासनाने शालेय शिक्षण विभागावर स्थूल राज्य उत्पन्नाच्या किमान ६ टक्के खर्च करणे अपेक्षित असतानाही मागील अनेक वर्षांपासून खर्च करण्यात येत नसल्याबाबत

**(३) १५०६५ (२२-११-२०२२) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण सरनाईक, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने शालेय शिक्षण विभागावर स्थूल राज्य उत्पन्नाच्या किमान ६ टक्के खर्च करणे अपेक्षित असतानाही मागील पाच वर्षांपासून खर्च करण्यात येत नसल्याचे माहे एप्रिल, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शालेय शिक्षण विभागावर स्थूल राज्य उत्पन्नाच्या किमान ६ टक्के खर्च करण्याच्या अनुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (२६-०७-२०२३) :** (१), (२) व (३) राज्य स्थूल उत्पन्नाच्या साधारणत: २ टक्के खर्च शालेय शिक्षणावर करण्यात येतो. सदर खर्च हा राज्याच्या एकूण वार्षिक खर्चाच्या साधारणत: १६ ते १८ टक्के इतका होतो. सन २०२३-२४ करीता राज्याच्या एकूण अर्थसंकल्पाच्या १५.८२ टक्के इतका निधी शालेय शिक्षण विभागासाठी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे.

---

## डी.सी.पी.एस/ एन.पी.एस. खाते नसणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाचा हप्ता रोखीने मिळणेबाबत.

**(४) १५७३१ (२८-१२-२०२२) श्री.किरण सरनाईक, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)डी.सी.पी.एस/ एन.पी.एस. खाते नसणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाचा हप्ता अद्यापपर्यंत रोखीने मिळाला नसल्याचे माहे मे २०२२ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार डी.सी.पी.एस/ एन.पी.एस. खाते नसणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाचा हप्ता रोखीने मिळणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (२६-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक १/१/२०१६ ते ३१/१२/२०१८ या कालावधीमधील सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनाची अनुज्ञेय थकबाकी प्रदान करण्याची पध्दती वित्त विभागाच्या मान्यतेने शासन निर्णय दिनांक १०/१/२०२० अन्वये लागू करण्यात आली. त्यानुसार राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी ज्यांना भविष्य निर्वाह निधी योजना व परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्ती वेतन

योजना लागू आहे व जे शिक्षक शिक्षकेतर अंशत: अनुदानित/अर्धवेळ सेवेत आहेत, अशांसाठीच्या थकबाकीच्या प्रदानाची पध्दती नमूद केलेली आहे. दरम्यानच्या काळात असे निदर्शनात आले की, काही शिक्षकांनी त्यांना परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू असतानाही, सदर योजना अनिवार्य असतानाही, सदर खाते उघडलेले नाही. अशांना ७ व्या वेतन आयोगाची थकबाकी देण्यात आलेली नाही. तर अशा कर्मचाऱ्यांची माहिती मागविण्यात आलेली असून, त्यानंतर वित्त विभागाच्या मान्यतेने याबाबत कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सुदर्शन वाल्मिकी मेहतर समाजाला विशेष आरक्षण लागू करुन कोटा निश्चित करण्याबाबत

**(५) १६९७४ (२५-०३-२०२३) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मेहतर समाजाला अनुसूचित जाती प्रवर्गात अंतर्भुत केले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुसूचित जाती प्रवर्गात अनेक जातीचा समावेश असल्याने मेहतर समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण, नोकरीकरीता संधी मिळत नसल्यामुळे अनुसूचित जाती करीता राखीव असलेल्या १३ टक्के राखीव आरक्षण कोट्यातून ५ टक्के आरक्षण मेहतर समाजासाठी स्वतंत्ररित्या ठेवण्याची मागणी अखिल भारतीय वाल्मिकी महापंचायतीने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट असणाऱ्या सुदर्शन वाल्मिकी मेहतर समाजाला विशेष आरक्षण लागू करुन कोटा निश्चित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

शासनपत्र, दिनांक २६/०९/२००८ अन्वये राज्याकरीता मागासवर्गीय जातींची संकलित यादी शासनाकडून जाहीर करण्यात आलेली असून सदर यादीत मेहतर जातीचा अनुसूचित जाती प्रवर्गामध्ये अनु.क्र.१२ येथे समावेश आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे व महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांचेकडून अहवाल मागविण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सनदी अधिकाऱ्यांच्या संवर्गनिहाय आढाव्याबाबत

**(६) १७०३१ (१७-०२-२०२३) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा

खुलासा करतील काय :-

(१) भारतीय प्रशासन सेवेतील ४७ अधिकारी पुढील वर्षापर्यंत सेवानिवृत्त होत असल्याने राज्य शासनात सनदी अधिकाऱ्यांची कमतरता जाणवणार असून पुरेसे सनदी अधिकारी राज्याला मिळावेत यासाठी केंद्रीय कार्मिक व प्रशासन विभागाला माहे डिसेंबर, २०२२ अखेरपर्यंत प्रस्ताव पाठवणे आवश्यक असतानाही संबंधित शासकीय विभागांनी सामान्य प्रशासन विभागाकडे संवर्गनिहाय आढावा सादर केला नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात सध्या ३३० भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांची संख्या असून ४७ अधिकाऱ्यांच्या निवृत्तीनंतर राज्याकडून सनदी अधिकाऱ्यांची संवर्गनिहाय मागणी सादर न झाल्यास, राज्याला आवश्यकता नाही असे गृहीत धरुन अधिकारी उपलब्ध न केल्यास प्रशासकीय कामकाजात अडचणी निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील सनदी अधिकाऱ्यांच्या संवर्गनिहाय आढाव्याबद्दल सर्व शासकीय विभागांशी समन्वय साधून आवश्यक आकडेवारीचा अहवाल केंद्रीय कार्मिक व प्रशासन विभागाला पाठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही. भाप्रसे अधिकाऱ्यांच्या सेवानिवृत्तीमुळे रिक्त होणाऱ्या पदावर नवीन अधिकारी नियुक्त करणे व केंद्र शासनास संवर्गनिहाय आढावा सादर करणे हे दोन भिन्न विषय आहेत.
(२) हे ही खरे नाही. सन २०२३ मध्ये महाराष्ट्र राज्य संवर्गातील २९ अधिकारी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. सेवानिवृत्तीमुळे रिक्त होणाऱ्या पदावर अन्य अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येते. त्यामुळे प्रशासकीय कामकाजात अडचणी निर्माण होईल हे म्हणणे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही. संवर्ग आढावा सन २०२३ मध्ये करावयाचा असून सर्व शासकीय विभागांकडून त्यांच्या अधिनस्त भाप्रसे पदांबाबतची माहिती घेऊन प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य परिवहन महामंडळातील महिला कर्मचारी बालसंगोपन रजेच्या लाभापासून वंचित असल्याबाबत

**(७) १७०५७ (०९-०२-२०२३) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १६२५७ ला दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या महिला कर्मचारी बालसंगोपन रजेच्या लाभापासून वंचित असल्यामुळे महिला कर्मचाऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळातील महिला कर्मचाऱ्यांना कुटुंबासाठी वेळ देता येत नसल्याने, मुलांचे शिक्षण व त्यांच्याकडे लक्ष देता यावे या दृष्टिकोनातून बाल संगोपन रजा देण्याचा निर्णय तत्कालीन मा.परिवहन मंत्र्यांनी घेतला असतानाही त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्य मार्ग परिवहन महामंडळातील महिला कर्मचाऱ्यांना १८० दिवसांची रजा कुठल्याही प्रकारचे बंधन न घालता मिळावी याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२७-०२-२०२३) :** (१), (२), (३) व (४) महिला कर्मचाऱ्यांना बालसंगोपन रजेचा लाभ शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.संकीर्ण-२०१७/ प्र.क्र.२५/सेवा-६, दिनांक २३/०७/२०१८ अन्वये देण्यात आला असून त्याची अमंलबजावणी रा.प. महामंडळात देखील करण्याबाबत, महामंडळ ठराव क्र.२०१८:१२:३३, दिनांक ३१/१२/२०१८ पारित करण्यात आला आहे व त्यानुसार परिपत्रकीय सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

---

## तारापूर (जि.पालघर) औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांमधून प्रदूषित रासायनिक सांडपाणी समुद्रात सोडणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत

**(८) १७०६१ (०९-०२-२०२३) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तारापूर (जि.पालघर) औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांमधून प्रक्रिया न केलेले प्रदूषित रासायनिक सांडपाणी समुद्रात सोडण्यात येत असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास कोस्ट गार्डने हेलिकॉप्टरमधून काढलेल्या छायाचित्रांतून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रक्रिया न केलेले प्रदूषित रासायनिक सांडपाणी समुद्रात सोडणाऱ्या तारापूर औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) दिनांक २४/१२/२०२२ रोजी निवासी जिल्हाधिकारी, पालघर यांच्यामार्फत समाज माध्यमाद्वारे प्राप्त झालेल्या चित्रफीत तथा छायाचित्रामध्ये अरबी समुद्रात नवापूर किनाऱ्याजवळ काळसर रंगाचा तवंग आढळून आला होता.

त्यानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत टीइपीएस-सीईटीपी यांची पाहणी केली असता सदर सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रातील कलर कमी करण्यासाठी वापरण्यात येणारे PAC या प्रक्रिया केमिकलचा साठा संपल्यामुळे सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेमधून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ सम्प

क्रं.५ येथे पुढील विल्हेवाटीसाठी सोडण्यात आलेल्या सांडपाण्याचा रंग काळसर स्वरूपाचा आढळून आला होता.

याबाबत सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र चालविणाऱ्या मे. टीइपीएस-सीईटीपी, एम.आय.डी.सी. तारापूर, ता.जि.पालघर यांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक २६/१२/२०२२ रोजी प्रस्तावित आदेश देण्यात आले आहेत.

तसेच सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्राचा TEPS-CETP कडून ताबा घेणे व स्वत: अथवा एखाद्या बाह्य तज्ञ संस्थेमार्फत त्यांचे कामकाज पाहणे याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला दिनांक ०४/०२/२०२३ रोजी निर्देश दिले असून त्याबाबत पुढील कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पांगोली (जि.गोंदिया) नदीचे पुनरुज्जीवन करण्याबाबत

**(९) १७२८४ (१७-०२-२०२३) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया व गोरेगांव (जि.गोंदिया) तालुक्यातील हजारो शेतकरी पांगोली नदीच्या पाण्यावर अवलंबून असून या नदीमध्ये प्लास्टिकच्या पिशव्या, बाटल्या, स्मशाान घाटातील कचरा, मंदिरातील निर्माल्य व इतर वस्तू टाकण्यात येत असल्यामुळे गाळाच्या माध्यमातून पांगोली नदी प्रदूषित झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पांगोली नदीचे पुनरूज्जीवन करण्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पांगोली नदीच्या प्रदूषणामुळे गोंदिया तालुक्यातील सुमारे ३० कि.मी. लाभाचे क्षेत्र, गोरेगांव तालुक्यातील २० कि.मी. लाभाचे क्षेत्र आणि आमगांव तालुक्यातील १५ कि.मी. लाभाचे क्षेत्र प्रदूषित पाण्यामुळे बाधित झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पांगोली नदीचे पुनरुज्जीवन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०३-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, गोंदिया यांच्याकडून प्राप्त अहवालानूसार पांगोली नदी उगम ते बाघ नदी संगमापर्यंतच्या लबंछेद व काटछेदच्या सर्व्हेक्षणाच्या कामास मृद व जलसंधारण विभागामार्फत सुरूवात करण्यात आली आहे. सदर सर्व्हेक्षण पूर्ण झाल्यानंतर पांगोली नदीचे खोलीकरण करुन पुनरुज्जीवन करण्याबाबतचा प्रकल्प अहवाल शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची तजवीज जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, गोंदिया यांनी केली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती विभागातील पणन महासंघामधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१०) १७२९७ (१७-०२-२०२३) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागातील पणन महासंघामध्ये एकूण ११२६ कर्मचाऱ्यांची पदे मंजूर असताना पणन महासंघाकडून १०५ कर्मचारी रुजू झाले असून १०२१ पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रिक्त पदामध्ये उच्च श्रेणीसह प्रथम श्रेणी, ग्रेडर्स, द्वितीय श्रेणी, तृतीय श्रेणी आणि चतुर्थ श्रेणीतील सर्वच अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कापूस उत्पादक शेतकऱ्यांना किमान हमीभाव देतांना खुल्या बाजारात होणारा गैरप्रकार रोखण्याच्या दृष्टीने कापूस एकाधिकार योजना अस्तित्वात आली असून खुल्या आर्थिक व्यवस्थेमुळे पणन महासंघ अस्तित्वात आला आहे, सदर माध्यमातून कापूस उत्पादक शेतकऱ्यांना किमान हमीभाव देण्याकडे शासनाच्या पणन महासंघाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अमरावती विभागातील पणन महासंघामधील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-०३-२०२३) :** (१) व (२) सन २००१ मध्ये कापूस एकाधिकार खरेदी योजना बंद झाल्यापासून कापसाला खुल्या बाजारात मिळणारा चांगला दर व कापूस पणन महासंघाला सतत होत असणारा तोटा, उत्पन्नाच्या स्त्रोतांचा अभाव इत्यादी कारणांमुळे कापूस पणन महासंघाने स्वेच्छा सेवानिवृत्ती योजना लागू केली. सदर स्वेच्छा सेवानिवृत्ती योजना ९४० अधिकारी / कर्मचाऱ्यांनी स्विकारली. स्वेच्छा निवृत्तीनंतरच्या ११३१ पदांच्या नविन आकृतीबंधास पणन संचालकांनी दिनांक ०७/०८/२००७ रोजी मंजूरी दिली. तथापि, सदर पदांवर कापूस पणन महासंघाने अधिकारी/ कर्मचाऱ्यांची नव्याने भरती न केल्याने तसेच अधिकारी / कर्मचारी वेळोवेळी सेवानिवृत्त झाल्याने त्या त्या वेळी पदे रिक्त दिसून येत आहेत. त्यामध्ये कापूस पणन महासंघातील सर्व श्रेणीतील पदांचा समावेश आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघामध्ये एकूण ११ विभाग असून, अमरावती हा त्यातील एक विभाग आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या मालास रास्त व किफायतशीर भाव मिळवून देण्याच्या उद्देशाने राज्यात सन १९७२-७३ पासून कापूस एकाधिकार खरेदी योजना राबविण्यात येत होती. सदर योजनेंतर्गत संपूर्ण राज्यात कापूस पणन महासंघामार्फत कापूस खरेदी करण्यात येत होती. सन १९९९-२००० मध्ये GATT करार अस्तित्त्वात आल्याने बाजार सर्वांसाठी खुला झाला. खुल्या बाजारातील किंमतीचा कल विचारात घेऊन सन २००१ पासून कापूस एकाधिकार योजना बंद करण्यात आली.

त्यानंतर हंगाम २००८-०९ ते हंगाम २०१३-१४ पर्यंत केंद्र शासनाचे मुख्य अभिकर्ता नाफेड यांचे व हंगाम २०१४-१५ ते हंगाम २०२०-२१ पर्यंत भारतीय कपास निगम लि. (सी.सी.आय.) यांचे उपअभिकर्ता म्हणून कापूस पणन महासंघाद्वारे किमान आधारभूत दराने कापूस खरेदी योजना राबविण्यात आली.

सन २००० ते २००३, २००४ ते २००७, २००८-०९, २०१४-१५, २०१९-२० व २०२०-२१ या कालावधीतील कापूस हंगामात हमी दराने कापूस खरेदीचे काम कापूस पणन महासंघाने केले आहे.

तथापि, सन २००३-०४, २००७-०८, २००९-१०, २०१२-१३, २०१५-१६ व सन २०१७ ते २०१९ या कालावधीतील कापूस हंगामात कापूस पणन महासंघाने हमी दराने अत्यंत अल्प कापूस खरेदीचे काम केलेले आहे. तसेच २०१० ते २०१२, २०१३-१४, २०१६-१७ व २०२१ ते २०२३ या कालावधीतील कापूस हंगामात खुल्या बाजारात कापसाचे दर हमी दरापेक्षा जास्त असल्याने कापूस पणन महासंघाने हमी दराने कापूस खरेदीचे काम केलेले नाही.

कापूस पणन महासंघात सध्या ९६ अधिकारी/ कर्मचारी कार्यरत असून त्यांच्याकडे हमी दराने कापूस खरेदी व तदनुषंगिक कामाव्यतिरिक्त अन्य कोणतेही काम नाही. खुल्या बाजारात कापसाचे दर हमी दरापेक्षा जास्त असणाऱ्या हंगामात हमी दराने कापूस खरेदी होत नसल्याने त्या हंगामात व सध्या महासंघातील अधिकारी/ कर्मचारी यांना कोणतेही काम उपलब्ध नाही. सदर अधिकारी/कर्मचारी यांना ७ व्या वेतन आयोगानुसार महासंघाकडून वेतन दिले जात असून, ते कापूस पणन महासंघाच्या ठेवी व गोदाम भाडे यातून प्राप्त होणाऱ्या रक्कमेमधून अदा केले जाते.

(५) प्रश्न उद् भवत नाही.

---

## उंब्रज (ता.कराड,जि.सातारा) येथील भूकंपग्रस्त व पुरग्रस्त भूखंड धारकांची ७/१२ वर नोंद घेण्याबाबत

**(११) १७३४१ (२५-०३-२०२३) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :**
सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंब्रज (ता.कराड, जि.सातारा) येथे सन १९६७ मध्ये झालेल्या भूकंपात अनेक मागासवर्गीयांची घरे जमीनदोस्त झाली असून तसेच सन १९७६ मध्ये कृष्णा नदीला आलेल्या महापूरामुळे अनेकांची घरे वाहून गेल्यामुळे बेघर झालेल्या या मागासवर्गीय समाजासाठी उंब्रज याच गावातील सर्वे नंबर ४५/१, ४५/२ आणि ४५/३ हे क्षेत्र पुनर्वसन करण्यासाठी ११६ प्लॉटची आखणी करण्यात येऊन त्यांना देण्यात आले असूनही ११६ भूखंडापैकी केवळ २७ भूखंडधारकांचीच ७/१२ वर नोंद घेण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित भूखंडधारकांची ७/१२ वर लवकरात लवकर नोंद करण्याबाबत भूकंपग्रस्त व पुरग्रस्तांनी मागणी करुनही तसेच याबाबत सभागृहात प्रश्न उपस्थित करण्यात येऊनही भूखंड धारकांची ७/१२ वर नोंद घेण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तुत ठिकाणी अस्तित्वात असलेल्या भूकंपग्रस्त व पूरग्रस्त गावाठाणामध्ये उप अधीक्षक, भूमी अभिलेख कराड यांचेमार्फत सध्याच्या वहिवाटानुसार फेरमोजणीची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, कार्यवाहीची सद्य:स्थित काय आहे, वहिवाटानुसार फेरमोजणी झालेल्या हद्दी कायम झाल्यानंतर संबंधितांची नावे ७/१२ सदरी दाखल करण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भूकंपग्रस्त व पुरग्रस्त भूखंड धारकांची ७/१२ वर नोंद घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२२-०५-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) व (४) सदरहू प्रकरणी जिल्हाधिकारी, सातारा यांच्या अहवालानुसार प्रस्तुत ठिकाणी भुकंपग्रस्त यादीतील ८५ लाभार्थी व इतर ६२ असे एकूण १४७ लोकांनी अतिक्रमण करून पक्क्या घरांचे बांधकाम केलेले आहे. सदरची बांधकामे रेखांकनाच्या हद्दीबाहेर झाली आहेत. रेखांकनातील सर्व खुल्या जागांमध्ये बांधकामे झाली असल्याने ती नियमित करता येत नाहीत. जागेतील अस्तित्वातील बांधकामामुळे एकूण ११६ भूखंड निश्चित करता येत नाहीत. यास्तव सुधारीत रेखांकन आराखडा अंतिमरीत्या तयार करणे शक्य झालेले नाही. त्यामुळे पात्र भुखंड धारकांची नावे ७/१२ वर लावण्यास उशीर झाला आहे. तथापि, आता चालू वहिवाटीप्रमाणे मोजणी पूर्ण झाल्यावर तयार झालेल्या रेखांकनाच्या नकाशास नगररचना विभागाची मान्यता घेवून पात्र धारकांची नावे ७/१२ वर लावण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांचेकडून करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी उपाययोजना क्षेत्रातील ४५ शाळांना अनुदान मंजूर होवूनही शाळेतील कर्मचाऱ्यांना नियमीत वेतन मिळत नसल्याबाबत

**(१२) १७५१८ (२५-०३-२०२३) श्री.रामदास आंबटकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आदिवासी उपाय योजना क्षेत्रातील ४५ शाळांना सन २००८ मध्ये अनुदान मंजूर होवून सदर शाळेतील कर्मचाऱ्यांना १४ वर्षे होवूनही नियमीत वेतन मिळत नसल्याचे दिनांक २/०१/२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर अनुदानित शाळेतील कर्मचारी शिक्षकांना त्वरीत वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (१२-०७-२०२३) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) व (३) शालेय शिक्षण विभागास आदिवासी क्षेत्रातील माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा आणि सैनिकी शाळांच्या आदिवासी तुकड्यावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतनासाठी आदिवासी

विकास विभागाकडून २२०२१९०१, २२०२१९४८ व २२०२ एच ९७३ या लेखाशीर्षाखाली आर्थिक तरतुद उपलब्ध करून दिली जाते. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात विभागाच्या मागणीपेक्षा आदिवासी विकास विभागाकडून सदर लेखाशीर्षाखाली अल्पशी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आली. त्यानुसार सदर लेखाशीर्षाखाली उपलब्ध झालेल्या तरतुदीतून वेतन अदा करण्यात आलेले आहे. सदर आवश्यक असणाऱ्या निधीसाठी डिसेंबर, २०२२ चे हिवाळी (चतुर्थ) अधिवेशनात सादर केलेली पुरवणी मागणी मान्य झाली आहे. सदर पुरवणी मागणीव्दारे प्राप्त निधीतून नियमित वेतनाची, देयके मार्च, २०२३ अखेर अदा करण्यात आली आहेत.

---

## मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाकडून अल्पसंख्यांक बेरोजगारांना कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१३) १७६४४ (२५-०३-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मा.मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाकडून अल्पसंख्यांक बेरोजगारांना रुपये ३० लाखांपर्यंत कर्ज देण्याबाबत कर्ज वितरक बँकांकडून दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत राज्यातील किती अल्पसंख्यांक बेरोजगारांना कर्ज उपलब्ध करुन देण्यात आले आहे, तसेच उर्वरित बेरोजगारांना कर्जे केव्हापर्यंत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाकडून अल्पसंख्यांक बेरोजगारांना कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही, मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ हे राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित महामंडळ, नवी दिल्ली (NMDFC) यांची राज्य वाहीनीकृत यंत्रणा म्हणून महाराष्ट्र राज्यामध्ये कार्यरत आहे. NMDFC मार्फत महामंडळास कर्ज स्वरुपात निधी उपलब्ध होतो. NMDFC मार्फत मुदत कर्ज योजनेंतर्गत अल्पसंख्याक बेरोजगारांना व्यवसायासाठी Credit Line-१ अंतर्गत रुपये २०.०० लाखापर्यंत व Credit Line-II अंतर्गत रुपये ३०.०० लाखापर्यंत कर्ज उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजनेंतर्गत भारतरत्न मौलाना अब्दुल कलाम आजाद यांच्या जयंती दिनापासून म्हणजेच दिनांक ११ नोव्हेंबर,२०२२ पासून नव्याने अर्ज स्वीकारण्यात येत आहेत. सदर योजनेंतर्गत मंजुरीपत्रे निर्गमित करण्यात आली आहेत, वैधानिक दस्तावेज व अगाऊ दिनांकित धनादेशाची पूर्तता केल्यानंतर महामंडळामार्फत सदर कर्जाची रक्कम संबंधित लाभार्थ्याच्या खात्यावर जमा करणे प्रस्तावित आहे.

(२) NMDFC मार्फत राबविण्यात येणाऱ्या मुदत कर्ज योजनेंतर्गत राज्यातील सर्व जिल्हा कार्यालयामध्ये आतापर्यंत १५५३ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी १४४४ अर्ज मुख्यालयास प्राप्त झाले असून त्यापैकी ७८३ अर्जदारांना मंजुरीपत्रे निर्गमित करण्यात आलेली आहेत. वैधानिक दस्तावेजांची पूर्तता केलेल्या लाभार्थ्यांना कर्जाची रक्कम वितरित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही. कर्ज मंजुरीपत्र निर्गमित केलेल्या लाभार्थ्यांनी वैधानिक दस्तावेज व आगाऊ दिनांकित धनादेशाची पूर्तता जिल्हा कार्यालयामध्ये करणे अपेक्षित आहे. ज्या लाथार्थ्यांनी वैधानिक दस्तावेज व आगाऊ दिनांकित धनादेशाची पूर्तता जिल्हा कार्यालयामध्ये केलेली आहे तसेच कर्ज वसुलीसाठी NACH बाबतची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर मंजूर करण्यात आलेल्या कर्जाची रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ग्राम उमरा (ता.अकोट, जि.अकोला) येथील अपंग कुटुंबास शासकीय योजनाचा लाभ मिळवून देण्याबाबत

**(१४) १७७२० (२५-०३-२०२३) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्राम उमरा (ता.अकोट, जि.अकोला) येथील श्री.नारायण गणेशराव इंगळे यांची पत्नी पायाने अपंग असून त्यांना ४ वर्षाची मुलगी असूनही श्री.इंगळे यांना सन २०१२ पासून शासनाच्या योजनांचा कोणताही लाभ मिळाला नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कुटुंबाचे अतिवृष्टीमुळे झालेल्या पावसामध्ये राहते घरही पूर्णत: पडल्याने कुटुंब उघड्यावर आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाकडून अपंग बेघर लोकांसाठी विविध योजना घोषित झालेल्या असूनही सदर योजनेची अंमलबजावणी होत नसल्यामुळे गोरगरीब नागरिकांना योजनेच्या लाभापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्राम उमरा येथील अपंग कुटुंबास शासकीय योजनाचा लाभ मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) श्री नारायण गणेश इंगळे यांना ग्रामपंचायत कडुन ५% दिव्यांग कल्याण निधीतुन विशेष बाब म्हणून सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे व घरकुल मंजुरीसाठी त्याचा प्रस्ताव जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अकोला यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला असून मंजुरी प्राप्त होताच घरकुलाचा लाभ देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिडको (नवी मुंबई) महामंडळाच्या बी.एम.टी.सी. कर्मचाऱ्यांच्या व त्यांच्या वारसांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याबाबत

**(१५) १७८२१ (२५-०३-२०२३) श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.निलय नाईक, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई शहरात सिडको महामंडळाची स्थापना करण्यात आली असून विविध पायाभूत सुविधांची पूर्तता करताना सिडको महामंडळाने मुंबईतील बेस्टच्या धरतीवर नवी मुंबई शहराकरीता बी.एम.टी.सी. या नावाने सुरु केलेली स्वतंत्र परिवहन सेवा सन १९८४ मध्ये बंद केल्यामुळे १६०० कर्मचारी बेरोजगार झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बी.एम.टी.सी. सेवा बंद करताना त्यातील प्रत्येक कामगारांचे पुनर्वसन करण्याचे आश्वासन सिडको महामंडळाचे तत्कालीन व्यवस्थापनाने देऊनही कामगारांच्या समस्या कायम आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बी.एम.टी.सी. कामगारांना/त्यांच्या वारसांना नवी मुंबई १०×१० क्षेत्रफळ दुकानाचा गाळा किंवा भूखंड देण्याचा ठराव सिडको संचालक मंडळाने मंजूर करून तसेच बी.एम.टी.सी. कर्मचाऱ्यांना/त्यांच्या वारसांना पुनर्वसनाचा निधी तसेच इतर कायदेशीर देणे संबंधित कर्मचाऱ्यांना अदा करण्याचे निदेश तत्कालिन शासनाने दिनांक १३ जुलै, २०१३ रोजी देऊनही उपरोक्त बाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बी.एम.टी.सी. कामगारांना १०० चौ. फुटाचे दुकानांचे गाळे देण्याबाबत तसेच कर्मचाऱ्यांच्या व त्यांच्या वारसांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-०७-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) सिडको महामंडळाच्या स्तरावरतील त्रिसदस्यीय समितीच्या शिफारशीनुसार सर्वेक्षणाअंती माजी बी.एम.टी.सी. पात्र कर्मचाऱ्यांना पुनर्वसन योजनेंतर्गत १०X१० चौ.फुटांच्या गाळयांच्या वाटपाबाबत सिडको संचालक मंडळाच्या ठराव क्र.१०८४०, दिनांक २७/०६/२०१३, दिनांक १०/०७/२०१३ च्या ठरावास शासन मान्यता दिनांक ९/०९/२०१४ रोजी देण्यात आलेली आहे.

(४) बी.एम.टी.सी. कर्मचाऱ्यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने उचित निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अंकलखोप (ता.पलूस, जि.सांगली) येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारुन देखभाल, दुरुस्ती करण्याबाबत

**(१६) १७९७९ (२५-०३-२०२३) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील

काय :-

(१) अंकलखोप (ता.पलूस, जि.सांगली) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारुन स्मारकाचे लोकार्पण करण्यात आले नसल्याचे तसेच स्मारकाच्या परिसरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन मा.सामाजिक न्याय राज्यमंत्री यांनी मुंबई येथील बैठकीत अधिकाऱ्यांना स्मारकाचे हस्तांतरण ग्रामपंचायतीला करण्याबाबत, स्मारकाच्या परिसरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसविण्याबाबत तसेच स्मारकाच्या दैंनदिन व्यवस्थापनाबाबत समिती स्थापन करण्याचा सूचना दिल्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारुन देखभाल, दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-०७-२०२३) :** (१), (२) व (३) अंकलखोप (ता.पलुस जि.सांगली) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक या प्रकल्पाच्या मुख्य इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. परंतू इमारतीच्या देखभाल दुरूस्तीसाठी अंकलखोप ही ग्रामपंचायत आर्थिक दृष्ट्या सक्षम नसल्याने ग्रामपंचायतीने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रकल्प इमारत ताब्यात घेतलेली नाही. त्यामुळे प्रकल्पाच्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा अद्याप उभारण्यात आलेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रोहिंजण व खुटारी (ता.पनवेल, जि.रायगड) गावात नवी मुंबई महानगरपालिकेने वन विभागाच्या जमिनीवर कोणतीही परवानगी न घेता रस्त्याचे बांधकाम केल्याबाबत

**(१७) १८१२९ (२९-०३-२०२३) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रोहिंजण व खुटारी (ता.पनवेल, जि.रायगड) गावात नवी मुंबई महानगरपालिकेने वन विभागाच्या जमिनीवर वन विभागाची कोणतीही परवानगी न घेता दिनांक ८ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत ठराव मांडून रुपये ६४,३९,४२४ इतक्या रकमेची निविदा काढून मे.शिवकृपा डेव्हलपर्स मुलुंड या ठेकेदारास सिमेंटचे रस्ते बांधण्याचे काम दिले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने सदरहू रोहिंजण व खुटारी गावांतील वन विभागाच्या जमिनीवर अनधिकृतरित्या रस्ते बांधकाम करण्यासाठी महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत ठराव मांडणाऱ्या तसेच त्यांना अनुमोदन देणाऱ्या संबंधितांवर व उक्त कामास परवानगी दिलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२९-०७-२०२३) :** (१) व (२) पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील खुटारी ग्रामपंचायत या गावाचा पनवेल महानगरपालिकेत दिनांक २६/९/२०१६ च्य अधिसूचनेन्वये समावेश झाला आहे. तथापि, सदरचा समावेश होण्यापूर्वी या भागातील नागरिकांना रस्ते, गटार इ. पायाभुत सोयीसुविधा खुटारी ग्रामपंचायतीमार्फत पुरविण्यात येत होत्या.

खुटारी गावाचा महानगरपालिकेमध्ये समावेश होण्यापूर्वी तत्कालीन ग्रामपंचायतीमार्फत विकसित करण्यात आलेल्या रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी खुटारी गावातील एकनाथ म्हात्रे ते गोवर्धन किसन म्हात्रे घरापर्यंतच्या क्राँक्रीटीकरण करण्याच्या रुपये ६४.६९ लक्ष च्या कामास पनवेल महानगरपालिकेमार्फत दिनांक ८/०१/२०२१ रोजी मंजूरी दिली असून त्यानुसार सदरचे कार्यादेश दिनांक ११/१०/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.

तदनंतर परिक्षेत्र वन अधिकारी, पनवेल यांच्याकडून झालेल्या पत्र व्यवहारास अनुसरुन उपरोक्त काम करण्यात येऊ नये, असे संबंधित ठेकेदारास पनवेल महानगरपालिकेने कळविले आहे.

तथापि, पनवेल महानगरपालिकेने कोणत्याही रस्त्याचे अतिक्रमण वन विभागाच्या जागेत केली नसल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर येथील ट्रायबल इंडस्ट्रीअल पार्क कार्यान्वित करणेबाबत

**(१८) १८२०१ (२५-०३-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी चंद्रपूर येथे ट्रायबल इंडस्ट्रीअल पार्क माहे फेब्रुवारी, २०२३ अखेर कार्यान्वित होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ट्रायबल इंडस्ट्रीअल पार्क येथे किती उद्योग आले आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर उद्योग कार्यान्वित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (१२-०७-२०२३) :** (१) व (२)चंद्रपूर जिल्ह्याचा औद्योगिक विकास करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून चंद्रपूर जिल्ह्यात १३ औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यात आलेली असून एकूण ३२६३.८० हे.आर.जमीन संपादित करण्यात आलेली आहे. त्यात एकूण आरेखित भूखंड ११३० असून त्यापैकी वाटप भूखंड ८७५ असून २५५ भूखंड वाटपास उपलब्ध आहेत.

या व्यतिरिक्त पोंभूर्णा औद्योगिक क्षेत्रासाठी मौजे-कोसंबी (रिठ) येथील १०२.५० हे.आर. क्षेत्राकरिता भूसंपादनाची कार्यवाही सुरू आहे. ट्रायबल इंडस्ट्रियल पार्क अद्याप कार्यान्वित झालेला नाही. तथापि, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे ट्रायबल इंडस्ट्रीयल पार्क उभारणेबाबत जागेची मागणी आल्यास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रात ट्रायबल इंडस्ट्रियल पार्क करीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत उपलब्धतेनुसार जागा उपलब्ध करून देता येईल.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर शहरात नागनदीच्या स्वच्छता व सौंदर्यीकरणाच्या प्रकल्पात बाधित होणाऱ्या वस्त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(१९) १८३३३ (१७-०२-२०२३) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर : तारांकित प्रश्न क्रमांक १३६६५ ला दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील नागनदीच्या स्वच्छता व सौंदर्यीकरणाचा प्रस्ताव केंद्र शासन, राज्य शासन व महानगरपालिका यांच्या भागीदारीतून अंतिमत: मंजूर झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) त्यानुसार सदर प्रकल्पाकरिता एकूण रुपये १९२७ कोटींचा खर्च लागणार असून त्याची पूर्तता फ्रान्स शासनाकडून करण्यात येणार आहे, त्यानुसार रुपये १९२७ कोटींवर आकारले जाणारे व्याज दर किती आहे व त्याची परतफेड महानगरपालिकेद्वारे केली जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागनदीच्या काठावर वॉकिंग ट्रॅक आणि आकर्षक विद्युत व्यवस्था करण्याकरीता नागनदीच्या सभोवताली १५ मीटर नो डेव्हलपमेंट झोन करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागनदीच्या स्वच्छता व सौंदर्यीकरणाच्या प्रकल्पाची अंमलबजावणी करतांना नागनदीच्या सभोवताली १५ मीटर अंतर्गत असलेल्या ५० वर्ष जुन्या घरांच्या वस्त्या बाधित होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागनदीच्या स्वच्छता व सौंदर्यीकरणाच्या प्रकल्पात बाधित होणाऱ्या किनाऱ्यालगतच्या वस्त्यांचे पुर्नवसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-०३-२०२३) :** (१) व (२) "नाग नदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्प" हा प्रकल्प केंद्र शासनाकडे अंतिम मंजूरीस्तव प्रलंबित आहे.

(३), (४) व (५) हे खरे नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर येथील दिक्षा भूमीची विकास कामे करण्याबाबत

**(२०) १८३३४ (१७-०२-२०२३) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक १५९७५ ला दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील दिक्षा भूमी येथे दरवर्षी धम्मचक्र प्रवर्तन दिन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती व महापरिनिर्वाण दिवस यासह वर्षभर होणाऱ्या कार्यक्रमात देश विदेशातून मोठ्या संख्येने अनुयायी येत असून याठिकाणी अनुयायी यांच्याकरिता निवास, भोजन, स्वच्छतागृह व परिवहन इ. आवश्यक सुविधा नसल्यामुळे

अनुयायांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिक्षा भूमीचा सर्वांगीण विकास करण्याकरिता शासनामार्फत दोन टप्प्यात विकासकामे करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिक्षा भूमीचा विकास आराखड्यानुसार एकूण किती निधीची आवश्यकता आहे तसेच दिक्षा भूमीची विकासकामे किती कालावधीत पूर्ण होणार आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दिक्षा भूमीची विकास कामे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

दिक्षाभूमीच्या विकासासाठी दोन टप्प्यात विकास कामे करण्यात येणार आहेत.

(३) व (४)

उच्चस्तरीय सचिव समितीच्या दिनांक २०/०१/२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये प्रथम टप्प्यातील रुपये २००.३१ कोटी इतक्या रकमेच्या कामास मंजूरी प्रदान केली आहे. तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीच्या दिनांक २७/०३/२०१८ रोजी बैठकीतील निर्णयानुसार दिक्षाभूमी, नागपूर येथील विकास कामांना रुपये १००.०० कोटी मंजूर करण्यात आला होता.त्यानुषंगाने, विभागाच्या दिनांक ३१/०३/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये ४०.०० कोटी इतका निधी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांचेकडे वर्ग करण्यात आला आहे. सदर कामासाठीचे कार्यारंभ आदेश झाल्यानंतर कामे पूर्ण करण्यासाठी अंदाजे २४ महिने कालावधी अपेक्षित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.